## (९) श्री साईनाथप्रभाताष्टक

(पृथ्वी)

प्रभातसमयीं नभा शुभ रविप्रभा फांकली ।
स्मरे गुरू सदा अशा समयिं त्या छळे ना कली ।।
म्हणोनि कर जोडूनी करूं आता गुरूप्रार्थना ।
समर्थ गुरू साईनाथ पुरवी मनोवासना ।। १ ।।

तमा निरसि भानु हा गुरूहि नासि अज्ञानता ।
परंतु गुरूची करी न रविही कधीं साम्यता ।
पुन्हां तिमिर जन्म घे गुरुकृपेनि अज्ञान ना ।
समर्थ गुरू साईनाथ पुरवी मनोवासना ।। २ ।।

रवि प्रगट होउनि त्वरित घालवी आलसा ।
तसा गुरूहि सोडवी सकल दृष्कृतीलालसा ।।
हरोनि अभिमानही जडवि तत्पदीं भावना ।
समर्थ गुरू साइनाथ पुरवी मनोवासना ।। ३ ।।

गुरूसि उपमा दिसे विधिहरीहरांची उणी ।
कुठोनि मग येई ती कवनिं या उगी पाहुणी ।।
तुझीच उपमा तुला बरवि शोभते सज्जना ।
समर्थ गुरू साईनाथ पुरवी मनोवासना ।। ४ ।।

समाधि उतरोनियां गुरू चला मशिदीकडे ।
त्वदीय वचनोक्ति ती मधुर वारिती सांकडें ।।
अजातरिपु सद्‌गुरु अखिलपातका भंजना ।
समर्थ गुरू साईनाथ पुरवी मनोवासना ।। ५ ।।

अहा सुसमयासि या गुरू उठोनियां बैसले ।
विलोकुनि पदाश्रिता तदिय आपदे नासिलें ।।
असा सुहितकारि या जगतिं कोणिही अन्य ना ।
समर्थ गुरू साइनाथ पुरवी मनोवासना ।। ६ ।।

असे बहुत शाहणा परि न ज्या गुरूची कृपा ।
न तत्स्वहित त्या कळे करितसे रिकाम्या गपा ।।
जरी गुरूपदा धरी सुदृढ भक्तिनें तो मना ।
समर्थ गुरू साइनाथ पुरवी मनोवासना ।। ७ ।।

गुरो विनंति मी करीं हृदयमंदिरीं या बसा ।
समस्त जग हें गुरूस्वरूपची ठसो मानसा ।।
घडो सतत सत्कृती मतिहि दे जगत्पावना ।
समर्थ गुरू साइनाथ पुरवी मनोवासना ।। ८ ।।

स्त्रग्धरा

प्रेमें या अष्टकासी पढुनि गुरूवरा प्रार्थिती जे प्रभातीं ।
त्यांचे चित्तासि देतों अखिल हरूनियां भ्रांति
मी नित्य शांति ।।
ऐसें हें साइनाथें कथुनि सुचविलें जेवि या बालकासी ।
तेंवी त्या कृष्णपायी नमुनि सविनयें अर्पितों
अष्टकासी ।। ९ ।।